१६ वा केंद्रीय वित्त आयोग
(सन २०२६-२०३१)

१६ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणाऱ्या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२६-३१ वर्षासाठीचे निकष व संनियंत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना .

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय (शुध्दिपत्रक) क्रमांकः-सोविआ-२०२६/प्र.क्र.९२/वित्त-४(ई-१६७२९३७)**
बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
दिनांक : १६ जुलै, २०२६.

<u>वाचा</u>:-

**शासन निर्णय क्र.सोविआ-२०२६/प्र.क्र.९२/वित्त ४ दि.१५ जून, २०२६.**

**<u>शासन शुध्दिपत्रक:-</u>**

समक्रमांकाच्या दि.१५ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयातील पृष्ठ क्र.६ व ७ येथील **<u>कार्यक्षमता अनुदानासाठी पात्रता अटी</u>** हा परिच्छेद

**<u>कार्यक्षमता अनुदानासाठी पात्रता अटी :-</u>**

i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता घटक (RLB Performance Component): -

अ) ग्रामपंचायतीसाठी:- आर्थिक वर्षामध्ये पात्र होण्यासाठी, ग्रामपंचायतीने चालू आर्थिक वर्षामधील स्वत:च्या महसूल स्रोतापेक्षा (OSR) किमान १.०२५ पट महसूल वाढ साध्य करणे आवश्यक आहे. किंवा २०२५-२६ च्या OSR वर वार्षिक २.५% चक्रवाढ वाढ लागू केल्यानंतरची रक्कम यापैकी जी कमी असेल ती, तसेच, किमान रक्कम प्रति कुटुंब प्रतिवर्ष रु.१२०० इतकी असावी.

आ) पंचायत समित्यांसाठी:- जर त्यांच्या कार्यक्षेत्रातील ७५% ग्रामपंचायती ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता अनुदानासाठी पात्र ठरतील, तर पंचायत समिती ग्रामीण स्थानिक स्वराज्य कार्यक्षमता अनुदानसाठी पात्र ठरतील.

इ) जिल्हा परिषदांसाठी:-चालू आर्थिक वर्षामध्ये अनुदानासाठी पात्र होण्यासाठी, जिल्हा परिषदांनी वर्ष २०२६-२७ मध्ये,वर्ष २०२७-२८ मधील त्यांच्या OSR च्या किमान १.०२५ पट महसूल वाढ साध्य करणे आवश्यक आहे. किंवा २०२५-२६ च्या OSRवर वार्षिक २.५ % चक्रवाढ वाढ लागू केल्यानंतरची रक्कम यापैकी जी कमी असेल ती.

ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.

**i) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था कार्यक्षमता घटक (RLB Performance Component):-**

**(अ) ग्रामपंचायतींसाठी अट:** ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्वः उत्पन्न महसूलात (Own Source Revenue - OSR) वाढ करणे आवश्यक आहे. कोणत्याही वर्षासाठी (T), त्यांनी मागील वर्षात (T-१) खालीलपैकी एक उद्दिष्ट गाठणे आवश्यक आहे:

- २०२५-२६ च्या स्वतःच्या उत्पन्नावर (OSR) २.५% वार्षिक वाढ, किंवा
- वर्ष T-२ (T-१ च्या मागील वर्ष) मधील स्वतःच्या उत्पन्नाच्या १.०२५ पट वाढ. (यापैकी जे कमी असेल ते ग्राह्य धरले जाईल, परंतु किमान निकष दरवर्षी ₹ १,२०० प्रति कुटुंब असावा). ही अट तिसऱ्या वर्षापासून (२०२८-२९) लागू होईल.

**(आ) पंचायत समितीसाठी अट:** जर त्यांच्या कार्यक्षेत्रातील किमान ७५% ग्रामपंचायतींनी वरील स्वतःच्या उत्पन्नाची (OSR) अट पूर्ण केली, तरच पंचायत समिती या कामगिरी अनुदानासाठी पात्र ठरेल. ही अट देखील तिसऱ्या वर्षापासून लागू होईल.

**(इ) जिल्हा परिषदेसाठी अट:** जिल्हा परिषदेला कामगिरी अनुदानासाठी पात्र ठरण्याकरिता वर्ष T-१ मध्ये स्वतःच्या उत्पन्नाच्या (OSR) वाढीची तीच अट (पंचायत समितीसाठी लागू असलेली अट) पूर्ण करावी लागेल. ही अट सुद्धा तिसऱ्या वर्षापासून लागू होईल.

२. सदर शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०७१६११३८०७२५२० असा आहे. हे शुध्दिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by MANOJKUMAR SHRENIK SHETE
DN: c=IN, postalCode=410206, st=MAHARASHTRA, street=302 KOHINOOR COMPLEX ,PLOT NUMBER 25 ,RAIGARH,SECTOR NUMBER 21 KAMOTHE ,410206, l=RAIGARH, o=Personal, serialNumber=2b8a6046860edec9b80f99e591a5fd9e1197cbf3ebadcd9c91ac6fff44440f57, pseudonym=f48e52aab0bb428e8499636dd00bb412, 2.5.4.20=fb747e637e0a121446d3119c732a784dd0fe7a1e26457765f83c306f61f287e8, email=MANOJKUMARSHRENIKSHETE@GMAIL.COM, cn=MANOJKUMAR SHRENIK SHETE
Date: 2026.07.16 14:17:04 +05'30'

(डॉ.मनोजकुमार शेटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.
१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४.मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे सचिव
५. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
७. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधान परिषद
८. मा. विधानसभा व विधान परिषद सदस्य.
९. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१०. मा.प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
११. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
१२. महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखापरीक्षा), नागपूर
१३. मुख्य  कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),.
१४.उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
१५.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)